रत्नागिरी टाइम्स
गुरुवार, दि. ६ ऑक्टोबर २०२२

# हळबे महाविद्यालयात महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता शिबिराचे आयोजन

दोडामार्ग, ५ ऑक्टो. (प्रतिनिधी) - लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता शिबिराचे आयोजन केले होते.

यावेळी प्रचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या हस्ते महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सावंत यांनी महात्मा गांधीजींच्या कार्याचा परिचय करून देताना त्यांच्या विचारांची आज आवश्यकता आहे. जगाला महात्मा गांधीजींच्या अहिंसेची गरज आहे, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने गांधीजी वाचला पाहिजे, त्यांचे विचार आत्मसात करून त्यांची अंमलबजावणी स्वतःच्या जगण्यात करूया असा आशावाद व्यक्त करून सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर एन. एस. एस. व डी. एल. एल. इ. च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरातील प्लास्टिक, कचरा, वृक्षारोपण केलेल्या झाडांच्या आळी तयार करून महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. दिलीप बर्वे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.